# शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

ता. रेणापूर जि. लातूर (महाराष्ट्र)- ४१३ ५२७


# रूपरेषा

## मराठी विभाग

### नॅक तृतीय सायकल

### २०२२




# मराठी विभागाची संक्षिप्त रूपरेषा

## प्रस्तावना:

"माझा मराठाचि बोलू कौतुके |
परि अमृतातेहि पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके | मेळविन |"

**-संत ज्ञानेश्वर**

भाषा ही कोणत्याही मानवी सामाजिक जीवनाचा आधार आहे. ते परस्पर संवादाचे जसे प्रभावी माध्यम आहे तसेच ते ज्ञानसंचय, ज्ञानप्रदानाचे महत्त्वाचे माध्यम आहे. संस्कृती, इतिहास, राष्ट्र, सभ्यता, आचार-विचाराचे महत्त्वाचे साधन म्हणून भाषेकडे पाहिले जाते. भारतीय खंडप्राय देशात राज्यघटनेच्या कलमा नुसार प्रांतनिहाय २२ भाषा त्या त्या राज्याच्या राजभाषा म्हणून स्विकारल्या आहेत त्या भाषांपैकीच मराठी हि महाराष्ट्राची राजभाषा आहे. महाराष्ट्राची ती मातृभाषा आहे; तर भारतीय अभिजात भाषांपैकी चौथी भाषा मराठी आहे.

मराठी भाषेला साधारणतः लिखित साहित्याचा बाराशे वर्षांचा इतिहास लाभला आहे. महाराष्ट्रात आणि जगात पंधरा कोटी लोक मराठी भाषा बोलतात. प्राचिन कालखंडापासून अतिशय दर्जेदार साहित्याची निर्मिती मराठी भाषेतून झाली आहे. ज्ञानेश्वर-लीळाचरित्र, तुकारामांची-गाथा, नामदेवांची-अभंगवाणी, बखर, पोवाडे ही प्राचीन मराठी भाषेची खरी ओळख असून त्यांची ख्याती सातासामुद्रांपलीकडे पोहचली असून यांचा अनेक भाषांत अनुवादही झाला आहे. आधुनिक युगात निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक व ललित गद्य तसेच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि आदिवासी साहित्यातून देशभर आणि जगभर मराठीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. मराठी दलित साहित्य हे भारतीय दलित साहित्याला प्रेरणादायी ठरले आहे. समाजातील दीन, दलित, वंचित, उपेक्षित घटकांच्या मनोव्यथेचा पहिला हुंकार मराठी साहित्यातूनच उमटला. अभिजनांच्या साहित्य जाणिवांपेक्षा बहुजनांच्या जीवन वेदनेला स्थान देणारे मराठी साहित्यच आहे.

शिक्षणाची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी मातृभाषेसारखे दुसरे साधन असुशकत नाही; म्हणूनच महाराष्ट्रात उच्चशिक्षण मराठी भाषेतून दिले जाते. मराठी ही मुळात श्रमिकांची, कष्टक-यांची भाषा आहे. या सामान्यांच्या भाषेत अकराव्या शतकापासून संतानी सातत्याने ज्ञानाची क्रांती केली आहे. मराठीतील लोकवाङ्मय व लोकसंस्कृतीच्या खुणा मराठीतून विविधतेने नटलेल्या दिसतात.

जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषा नवनव्या आव्हानांना सामोरी जाऊन कधी त्यात सामावून तर कधी सामर्थ्याने अनेक क्षेत्रात प्रभावीपणे पदार्पण करताना दिसते आहे. या भाषिक संक्रमणाच्या युगातही मराठीने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवले आहे. कला, संस्कृती, क्रीडा, न्यायालयीन व वैधक कामकाज, गणित, विज्ञान, उपयोजीत मराठी, संगणक, वृतपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, मोबाईल इत्यादी अनेक क्षेत्रांत मराठी भाषा आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. या नव्या क्षेत्राची परिभाषा मराठीने आत्मसात केली आहे. या पुढेही मराठी भाषेला नव्या नव्या क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी सजग रहावे लागणार आहे.

महाविद्यालयात मराठी विभागाची स्थापना महाविद्यालयाच्या स्थापणे बरोबरच जून १९९३ साली झाली आहे. विभागात दोन पूर्णवेळ प्राध्यापक कार्यरत असून प्रा.डॉ. जाधव जयद्रथ हे विभाग प्रमुख म्हणून तर प्रा.डॉ शेरखाने चंद्रकांत हे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

पदवी स्तरावर मराठी हा विषय द्वितीय भाषा व ऐच्छिक भाषाविषय म्हणून शिकविला जातो. महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील बहुतांश विद्यार्थी मराठी भाषेची द्वितीय भाषा म्हणून निवड करतात. तसेच कला शाखेतील विद्यार्थी ऐच्छिक भाषाविषय म्हणून निवड करतात.

अध्ययन अध्यापनाबरोबर मराठी विभाग व इतर भाषाविभागाच्या वतीने भाषाअभ्यास मंडळाची स्थापना दर वर्षी केली जाते. या द्वारे वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यर्थ्यांमध्ये भाषिक अभिरूची निर्माण व्हावी म्हणून **‘अंकुर’** नावाचे भित्तीपत्रक चालविले जाते. कथा, कविता, वैचारिक, निबंध आदी प्रकारातून विद्यार्थी आपल्या सृजनशीलतेला या भित्तीपत्रकातून वाव करून देतात.

“आम्हां घरी धन | शब्दांचिच रत्ने
शब्दांचिच शस्त्रे | यत्ने करु
शब्देचि आमुच्या | जीवाचे जीवन
शब्दे वाटू धन | जनलोकां”

**-संत तुकाराम**

# हेतू आणि उद्देश

- ❖ मराठी साहित्यातील महानुभाव, वारकरी, समर्थ, पंडिती, शाहिरी संप्रदायांचे स्वरूप, प्रेरणा आणि प्रवृत्ती विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.
- ❖ आधुनिक काळातील मराठीतील कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललित गद्य इत्यादि साहित्य प्रकारांची ओळख करून देण्याबरोबरच या साहित्याच्या प्रेरणा, स्वरूप, विकास आणि प्रवृत्तींचा आढावा घेणे.
- ❖ स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर साहित्यातील विचारांचा मागोवा घेण्याबरोबरच बदलत्या काळानुसार साहित्यप्रवाहांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.
- ❖ मराठी भाषा व इतर भाषांचा समन्वय अनुवादातून साधता यावा याकरिता अनुवाद साहित्याची ओळख करून देऊन अनुवाद कला विकसित करणे. याबरोबरच भाषा शास्त्रातील विविध अभ्यास प्रवाहांचा व मराठी बोलींचा परिचय करून देणे.
- ❖ जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य व त्यातील विविध बदलांचा आढावा घेणे.
- ❖ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध साहित्य प्रकारातून अध्यापन करून मातृभाषेची आवड निर्माण करणे, याबरोबरच प्रमाण मराठी लेखनाची सवय लावणे, वाचन, लेखन आणि श्रवण ही मूलभूत कौशल्य विकसित करणे.
- ❖ पदवी अभ्यासक्रमातील व्यवहारिक मराठी भाषा ज्ञानाचा उपयोग दैनंदिन जीवनात करण्यास प्रवृत्त करणे. मराठी साहित्याची अभिरुची विद्यार्थ्यांना निर्माण करून देऊन साहित्य निर्मितीसाठी प्रेरित करणे.
- ❖ मराठी भाषा पंधरवडा, मराठी भाषा दिन व स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांना साहित्य लेखनास प्रवृत्त करून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे.

# मराठी विभागात उपलब्ध अभ्यासक्रम

| अ.क्र. | विषय अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | बी.ए.( द्वितीय भाषा) | ०२ वर्ष | १२० |
| २. | बी.कॉम.( द्वितीय भाषा) | ०२ वर्ष | १२० |
| ३. | बी.एस्सी.( द्वितीय भाषा) | ०२ वर्ष | १२० |
| ४. | बी.ए.( ऐच्छिक) | ०३ वर्ष | १२० |

# प्राध्यापकांचा परिचय

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | पद | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | एम.ए.,बी.एड., पीएच.डी. | प्राध्यापक आणि विभाग प्रमुख | २४ वर्षे |
| २. | प्रा.डॉ.शेरखाने सी.जे. | एम.ए., पीएच.डी. | सहायक प्राध्यापक | 24 वर्षे |

# ऑनलाईन अध्यापन समन्वयक

- **कोरोना काळात विद्यापीठ पातळीवरून बी.ए. पदवी ऑनलाईन अध्यापनासाठी समन्वयक म्हणून कार्य**






# प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या यादी

| नॅक मूल्यांकन<br>२०१७-२०२२ | | |
|---|---|---|
| वर्ष | व्दितीय भाषा | ऐच्छिक |
| २०१७-२०१८ | १९५ | ७४ |
| २०१८-२०१९ | १७४ | ५८ |
| २०१९-२०२० | १०६ | ५३ |
| २०२०-२०२१ | ९७ | ३७ |
| २०२१-२०२२ | १५० | ५१ |

# अंतिम वर्षातील निकाल

| नॅक मूल्यांकन<br>उन्हाळी-२०१८ ते उन्हाळी-२०२२ | |
|---|---|
| वर्ष | अंतिम वर्षाचा सरासरी निकाल |
| उन्हाळी-२०१८ | १००% |
| उन्हाळी-२०१९ | ६९% |
| उन्हाळी-२०२० | १००% |
| उन्हाळी-२०२१ | १००% |
| उन्हाळी-२०२२ | १००% |

# संशोधन योगदान

परिषद/ चर्चासत्र/ कार्यशाळा उपस्थिती आणि शोध निबंधाचे वाचन (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय)

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | नॅक मूल्यांकन २०१७-२०२२ |
|---|---|---|
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | २० |
| २. | प्रा.डॉ.शेरखाने सी.जे. | २५ |

# प्रकाशन कार्य

(i) ग्रंथ लेखन आणि संपादन ISSN/ISBN नंबर सहित

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | नॅक मूल्यांकन २०१७-२०२२ |
|---|---|---|
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | ०४ |
| २. | प्रा.डॉ.शेरखाने सी.जे. | - |

(ii) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रकाशित शोधनिबंध( मासिके ,परिषदा व चर्चासत्र)

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | नॅक मूल्यांकन २०१७-२०२२ |
|---|---|---|
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | १७ |
| २. | प्रा.डॉ.शेरखाने सी.जे. | ०७ |

# संशोधन मार्गदर्शन

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | नॅक मूल्यांकन २०१७-२०२२ | | |
|---|---|---|---|---|
| | | वाटप | नोंदणी | प्रदान |
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | ०५ | ०५ | ०५ |
| २. | प्रा.डॉ.शेरखाने सी.जे. | ०२ | - | - |

# लघु शोधप्रकल्प

| अ. क्र. | प्राध्यापकांचे नाव | शीर्षक | संस्था | कालावधि | मंजूर अनुदान रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रा.डॉ जाधव जे.एस. | १९९१ नंतरच्या मराठवाड्यातील मराठी ग्रामीण कथेचे बदलते स्वरूप | यू.जी.सी. नवी दिल्ली | ०२ वर्ष | ५५,०००/- |

# महविद्यालय आणि विद्यापीठ विकासात प्राध्यापकांचे योगदान

## १. प्रा.डॉ.जाधव जयद्रथ सुभाषराव:

| अ.क्र. | महाविद्यालय स्तर | विद्यापीठ स्तर |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, भाषा अभ्यास मंडळ | सदस्य, मराठी अभ्यास मंडळ |
| २. | सदस्य, माहिती पुस्तिका | सदस्य,बही:शाल व्याख्यानमाला -विद्यार्थी कल्याण |
| ३. | सदस्य, वाद-विवाद व्याख्यानमाला | सदस्य, संशोधन समिती |
| ४. | सदस्य, प्रवेश समिती | सदस्य, पेपर सेटिंग |
| ५. | सदस्य, ग्रंथालय समिती | सदस्य, भरारी पथक |
| ६. | कार्यकारी संपादक, ‘झेप-२०२०’रौप्य महोत्सवी विशेषांक | केंद्र प्रमुख विद्यापीठ परीक्षा |
| | | सह केंद्र प्रमुख विद्यापीठ परीक्षा |
| | | सदस्य, पेट आवेदनपत्र छाननी समिती |
| | | सदस्य, वार्षिक अंक निवड समिती |

## २. प्रा.डॉ.शेरखाने चंद्रकांत जानबा

| अ.क्र. | महाविद्यालय स्तर | विद्यापीठ स्तर |
|---|---|---|
| १. | प्रमुख, भाषा अभ्यास मंडळ | सदस्य, दक्षता पथक. |
| २. | प्रमुख,प्रसिद्धी समिती. | सदस्य, पेपर सेटिंग |
| ३. | सदस्य, शहीद बालाजी माले स्मारक बांधकाम समिती. | सदस्य, युवक महोत्सव सल्लागार समिती, विद्यार्थी विकास विभाग |
| ४. | सदस्य, ग्रंथालय समिती | सदस्य, महाविद्यालय सलग्नीकरण समिती |
| ५. | सदस्य, विशेष कक्ष समिती | |
| ६. | सदस्य, विद्यार्थी पालक योजना | |
| ७. | सह संपादक , ‘शिवराय’ वार्षिक अंक | |
| ८. | प्रमुख, राष्ट्रगीत समिती | |
| १०. | सदस्य, राष्ट्रीय एकात्मता समिती | |

# विभागाचे बलस्थाने, कमतरता, संधी व आव्हाने

## बलस्थाने

- संशोधन कार्यात उत्साहपूर्ण सहभाग
- विद्यार्थ्यांच्या लेखनाला प्रोत्साहन देण्यासाठी अंकुर भित्तीपत्रकाचे प्रकाशन
- मराठी भाषा पंधरवडा आणि मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांवर वाङ्मयीन संस्कार करण्यासाठी व्याख्याने, निबंध स्पर्धा, कविता लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मुद्रितशोधन पर स्पर्धा यांचे आयोजन
- भाषा कौशल्याच्या अभ्यासातून रोजगाराच्या विविध संधी (सुत्रसंचालन, संपादन, बातमी लेखन, संगणक टायपिंग, ब्लॉगलेखन इ.)
- मराठी भाषा अध्ययनातून मूल्यशिक्षण
- विभागातील सहाय्यक प्राध्यापक संशोधन कार्यात उत्साहपूर्ण सहभागी आहेत.
- मराठी साहित्यावर लेखन, समीक्षा, चर्चासत्रातून निबंध वाचन व संपादन ग्रंथाचे प्रकाशन केलेले आहे.

## कमतरता

- विभागाला स्वतंत्र ग्रंथालय नाही.

## संधी

- मराठी भाषा विभागाच्या वतीने राष्ट्रीय व आंरराष्ट्रीय भाषांचा तौलनिक अभ्यास करणे.
- मराठी संस्कृती व इतर संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करणे.

## भविष्यातील योजना

❖ राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करणे.

❖ मराठी बोलीभाषांचा अभ्यास करणे आणि बोली शब्दसंकलन करणे

❖ विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्याच्या उपयोजनासाठी प्रमाणपत्र कोर्सेस सुरू करणे

प्रा. डॉ. जयद्रथ सुभाषराव जाधव
प्रा. डॉ. चंद्रकांत जानबा शेरखाने.